RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १, अंक ११(२)] गुरुवार, एप्रिल ९, २०१५/चैत्र १९, शके १९३७ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक २०**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५.—** महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | **पृष्ठे** १-२ |

दिनांक ८ एप्रिल २०१५ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**एम. ए. सईद,**
शासनाचे प्रधान सचिव व विधि परामर्शी
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ९ एप्रिल २०१५ रोजी प्र

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम, २०१५ असे म्हणावे.

**२.** महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ च्या खंड (फ) मध्ये " मुंबई महानगरपालिका अधिनियम " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " असे नगरपालिका क्षेत्र " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

१९७५ चा महा. ४४.

" मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम याअन्वये महानगरपालिका घटित करण्यात आली आहे असे महानगरपालिका क्षेत्र, किंवा महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व

संक्षिप्त नाव.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम २ ची सुधारणा.

औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम २ च्या खंड (२४) च्या अर्थांतर्गत असलेले असे नगरपालिका क्षेत्र ". १९७५ चा महा. ४४.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये, पोट-कलम (४) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

१८८८ चा ३. १९४९ चा ५९. १९६५ चा महा. ४०.

" (५) पोट-कलमे (१) व (२) यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिका क्षेत्राच्या बाबतीत किंवा, यथास्थिती, नगरपरिषद क्षेत्राच्या बाबतीत, वृक्ष प्राधिकरण घटित करण्यात आले नसेल किंवा ते कोणत्याही कारणामुळे, कार्ये पार पाडू शकत नसेल त्याबाबतीत, अशा महानगरपालिकेचा आयुक्त किंवा अशा नगरपरिषदेचा मुख्य अधिकारी, हा वृक्ष प्राधिकारी म्हणून कार्य करील आणि तो, असे प्राधिकरण यथोचितरित्या घटित होईपर्यंत किंवा कार्य करण्यास समर्थ होईपर्यंत अशा क्षेत्रात वृक्ष प्राधिकरणाच्या सर्व अधिकारांचा वापर करील व सर्व कर्तव्ये पार पाडील :

परंतु, या कलमान्वये महानगरपालिका आयुक्ताने किंवा मुख्य अधिकाऱ्याने घेतलेला प्रत्येक निर्णय, असा निर्णय घेतल्याच्या लगतनंतर घेण्यात येणाऱ्या अशा महानगरपालिकेच्या, किंवा, यथास्थिती, नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात येईल. ".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.